N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S.(ठाणे):** गंगाझरी **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0039 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 22/02/2019 19:30 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 13(1)d |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 13 (2) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 22/02/2019

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/02/2019

**Time From (वेळेपासून):** 12:06 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 22/02/2019 **Time (वेळ):** 19:53 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 013 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/02/2019 19:53 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 5 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** एकोडी ,गोंदिया

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अमित सुभाष सतिसेवक

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

(c) **Date/Year of Birth (जन्म** 2000 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | इतर | 123456789 |

# फिर्याद

दिनांक :— २२/०२/२०१९

मी अमित सुभाष सतिसेवक, वय १९ वर्ष, धंदा— शिक्षण, रा. सेजगाव, ता. जि. गोंदिया मो.क्र. ८८३०७०९७२९/९०४९२३७२८०

मी दि. २२.०२.२०१९ रोजी पोलीस उपअधिक्षक श्री रमाकांत दत्तात्रय कोकाटे ला.प्र.वि गोंदिया यांचे समक्ष लोकसेवकाविरुध्द लाच मागणी संबधाने तक्रार नोंदविली. पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझी तक्रार संगणकावर टंकलिखीत करुन त्यावर माझी सही घेतली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

" मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथे येवून तक्रार नोंदवितो की, मी वर नमुद पत्यावर माझे परिवारासह राहतो.

माझेकडे माझी आई सौ. मायाबाई सुभाष सतिसेवक हिचे नावाने एम.एच. ३५ जी—९१०८ क्रमांकाचा स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर आहे. सदर ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतीचे तसेच माती/मुरूम वाहतुकीची कामे केली जातात.

दि. १९.०२.२०१९ रोजी मी माझ्याकडे असलेल्या ट्रॅक्टरने मातीची वाहतुक करीत असतांना माझा ट्रॅक्टर श्री. नेवारे, तलाठी यांनी आमच्या गावामध्ये पकडला. त्यावेळी मी त्यांना माझा ट्रॅक्टर सोडण्याबाबत विनंती केली असता त्यांनी माझे ट्रॅक्टरवर वर्षभर कोणतीही कार्यवाही न करण्याकरीता माझेकडे रू. १०,०००/— ची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना नाईलाजाने रू. २,०००/— दिले व उर्वरीत रू. ८,०००/— ची व्यवस्था करून नंतर आणुन देतो असे सांगितले. त्यानंतर श्री. नेवारे, तलाठी यांनी माझे ट्रॅक्टर सोडुन दिले.

त्यानंतर दि. २०.०२.२०१९ रोजी श्री. नेवारे, तलाठी यांनी माझे घरी येवुन माझ्याकडे उर्वरीत रू. ८,०००/— लाच रकमेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना एकमुस्त रू. ८,०००/— देणे शक्य नसल्याचे सांगितले. त्यावर त्यांनी टप्याटप्याने पैशे देण्यास सांगुन त्यापैकी प्रथम हप्ता रू. ३,०००/— एक—दोन दिवसात आणुन दे, असे सांगितले.

गै.अ. श्री. नेवारे, तलाठी, तलाठी कार्यालय सेजगांव, ता. तिरोडा, जि. गोंदिया यांनी माझ्याकडे माझ्या माती/मुरूम वाहतुक करणाऱ्या ट्रॅक्टरवर वर्षभर कोणतीही कार्यवाही न करण्याकरीता मागणी केलेली लाच रक्कम रू. ८,०००/— त्यांना देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने त्यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही करण्याकरीता स्वेछेने तक्रार देत आहे. श्री. नेवारे, तलाठी, तलाठी कार्यालय सेजगांव, ता. तिरोडा, जि. गोंदिया यांचेशी माझे पुर्वीचे कोणतेही आर्थिक देवाण—घेवाणीचे व्यवहार किंवा वैमनस्य नाही."

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी दोन शासकिय पंचांना पाचाराण करुन त्यांची ओळख करुन दिली. श्री कोकाटे यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन माझा सहीचा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांचे सुचनेवरुन सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली व तदनंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी व्हाईस रेकॉर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहीती दिली.

समक्ष

22.2.19

Amit
22.2.2019

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सेजगांव,तिरोडा,गंगाझरी,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सेजगांव,तिरोडा,गंगाझरी,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):** विद्यार्थी

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-8830709729

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | देवेंद्र टोलीराम नेवारे | | | 1. दांडेगांव,गोंदिया ,गंगाझरी,गोंदिया, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

प्रकरण अशा प्रकारे आहे की ,नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील आलोसे यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन तक्रारदाराकडे असलेल्या माती/मुरुम वाहतूक करणा-या ट्रक्टर वर वर्षभर कोणतीही कार्यवाही न करण्याकरिता 8000/-रु . लाच रक्कमेची मागणी करुन त्यापैकी,प्रथम हफ्ता म्हणून रु.3000/-लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शवुन ती लाच पंचासमक्ष स्विकारली असे फिर्यादीचे लेखी फिर्याद वरुन सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** SHYAM GURUDAS KALE(I (Inspector)) / PCMH91209 **or**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे** **Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार**

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी माझ्याकडुन सापळा कार्यवाहीसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रु. ३,०००/— (रु. ५००/— दराच्या ६ चलनी नोटा) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे गुणधर्म व प्रात्येक्षिक करुन दाखविले. तद्नंतर लाचेच्या रकमेस अँथ्रासीन पावडर लावली. त्याप्रमाणे सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीचे मार्फतीने लाच रक्कम स्विकारल्यावर फुलपॅन्टच्या खिश्यातुन हातरुमाल काढुन चेहरा पुसुन इशारा करण्यास मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहात पकडतील असे सांगीतले.

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डर द्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन व्हाईस रेकॉर्डर पिशवीत टाकुन माझ्या गळ्यात लटकवुन मला पंच क्रमांक १ यांचेसह मोटार सायकलने तलाठी कार्यालय, सेजगाव येथे जाण्यास रवाना केले. तलाठी कार्यालय, सेजगाव जवळ रस्त्यावर नेवारे, तलाठी सेजगांव यांचेशी बोलणी दरम्यान नेवारे, तलाठी यांनी माझ्याकडे असलेल्या माती/मुरूम वाहतुक करणाऱ्या ट्रॅक्टरवर वर्षभर कोणतीही कार्यवाही न करण्याकरीता ८,०००/— रुपये लाच रकमेची मागणी करुन त्यापैकी प्रथम हप्ता म्हणुन रु. ३,०००/— लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. सदर लाच रक्कम नेवारे, तलाठी सेजगाव यांनी व्यवस्था झाल्यानंतर आणुन देण्यास सांगीतले. त्यानंतर मी सापळा सदस्य थांबवुन असलेल्या ठिकाणी परत आल्यावर पंच क्रमांक १ च्या आवाजात व्हाईस रेकार्डर बंद करण्यात आला.

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकुण नेवारे, तलाठी सेजगाव यांनी माझ्याकडे असलेल्या माती/मुरूम वाहतुक करणाऱ्या ट्रॅक्टरवर वर्षभर कोणतीही कार्यवाही न करण्याकरीता ८,०००/— रुपये लाच रकमेची मागणी करुन त्यापैकी प्रथम हप्ता म्हणुन रु. ३,०००/— लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यावरुन नेवारे, तलाठी सेजगाव यांचेविरुध्द पुढील सापळा रचण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर अँथ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम रु. ३,०००/— माझे फुलपॅन्टचे उजव्या खिश्यात ठेवण्यात आली. त्यानंतर पंच क्र. १ यांचे आवाजात व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन व्हाईस रेकॉर्डर पिशवीत टाकुन माझ्या गळ्यात लटकवुन मला पंच क्रमांक १ यांचेसह मोटार सायकलने तलाठी कार्यालय, सेजगाव येथे जाण्यास रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागो—माग आले. तलाठी कार्यालय, सेजगाव येथे गेल्यावर नेवारे, तलाठी हे हजर मिळाले नाही. थोड्या वेळ थांबवुन नेवारे, तलाठी यांची येण्याची वाट पाहील्यानंतर त्यांना माझ्या मोबाईल फोन वरुन फोन केला. त्यावेळी फोनवर नेवारे, तलाठी यांनी मला ग्राम ऐकोडी येथे येण्यास सांगीतले. ग्राम ऐकोडी येथे एका चहा पान टपरीवर नेवारे, तलाठी हे हजर होते. त्यांचेशी बोलणी दरम्यान त्यांनी मला रु. ३,०००/— लाच मागीतली. त्यावरुन लाचेच्या रकमेस अँथ्रासीन पावडर लावलेल्या रु ३,०००/— नोटा माझे फुलपॅन्टचे उजव्या खिश्यातुन काढुन मी नेवारे, तलाठी यांना पंचासमक्ष दिले. त्यांनी लाच रक्कम रू. ३,०००/— आपले उजवे हाताने स्विकारून दोन्ही हाताने मोजून अंगात घातलेल्या फुलबाहयाचा शर्टाचे समोरील डावे बाजुच्या खिश्यात ठेवली. त्यानंतर मी पंच क्र. १ सोबत दर्शनी ठिकाणी येवुन सापळा पथकास माझे फुलपॅन्टचे खिश्यातुन हातरुमाल काढुन चेहरा पुसुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने नेवारे, तलाठी सेजगाव यांना रंगेहात पकडले.

समक्ष
[signature] 22.2.19

Amit
22.2.2019

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Amit
22.2.2019

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): ~~SHYAM GURUDAS KALE~~
**Rank**(पद): I (Inspector) Rajesh Sanap
**No.**(सं.): PCMH91209
HC 935

त्यानंतर पंच क्रमांक १ च्या आवाजात व्हाईस रेकार्डर बंद करुन पुढील कार्यवाही केली. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उपअधिक्षक श्री कोकाटे यांनी पंचनामा क्र. १ मध्ये घेतल्या आहेत.

तरी लोकसेवक देवेंद्र टोलीराम नेवारे, वय ३५ वर्ष, तलाठी, तलाठी कार्यालय सेजगाव, सा.क्र. ४, ता. तिरोडा, जि. गोंदिया यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करुन माझ्याकडे असलेल्या माती/मुरूम वाहतुक करणाऱ्या ट्रॅक्टरवर वर्षभर कोणतीही कार्यवाही न करण्याकरीता ८,०००/— रुपये लाच रकमेची मागणी करुन त्यापैकी प्रथम हप्ता म्हणुन रु. ३,०००/— लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शवुन ती लाच रक्कम रु. ३,०००/— त्यांनी माझ्याकडुन स्विकारली. म्हणुन माझी त्याचेविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असुन ती मला वाचुन दाखविण्यात आली. ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोवर व खरी आहे.

Amit
22.2.2019

समक्ष
22.2.19

(रमाकांत कोकाटे)
पोलीस उपअधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,गोंदिया

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** **(**संशयीत/आरोपीचे **(**माहित असलेल्या/पाहिलेल्या**)** शारीरिक वैशिष्टये**,** व्यंग आणि इतर तपशील**))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | साधारण/मध्यम | | गव्हाळ वर्ण | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | उजवा हात | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**

पोलीस स्टेशन, गंगाझरी जि. गोंदिया

## General Diary Details
## ठाणे दैनंदिनी तपशील

**Date** 22/02/2019 20:27

**State (राज्य):** महाराष्ट्र

**P.S. (पोलीस** गंगाझरी

**District** गोंदिया

1. **G.D. No. (ठाणे दैनंदिनी** 014
2. **G.D. Date (ठाणे दैनंदिनी** 22/02/2019 20:27 बजे
3. **G.D. Type (ठाणे दैनंदिनी** इतर
4. **Entry for (officer) (प्रविष्टि(अधिकार्यासाठी** SHYAMGURUDASKALE
5. **Case Type (प्रकरणाचा**
6. **G.D. Brief (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):**
   यावेळी नोंद आहे की, पो.स्टे. गंगाझरी जिल्हा गोंदिया अप क्र. 39/19 हा कलम 7,13(1)(d),13(2) ला.प्र.का.1988 या मुळ कायद्यातील कलमान्वये दाखल करण्यात आला असून सदर मुळ कायद्यात 2018मध्ये संशोधन(दुरुस्ती) झाले आहे. लाचलुचपत प्रतिबंध (संशोधन) अधिनियम 2018 हा कायदा सध्या सी.सी.टी.एन.एस. प्रणालीवर अपलोड नसल्याने सदरचा गुन्हा मुळ कायद्यातील कलमान्वये दाखल करण्यात आला आहे. कलम 7,13(1)(d),13(2) ला.प्र.का.-1988 यास कलम 7(a) लाचलुचपत प्रतिबंध (संशोधन) अधिनियम 2018 असे समजण्यात यावे.
7. **Subject (विषय):**
   कलम 7(a) लाचलुचपत प्रतिबंध (संशोधन) अधिनियम 2018 सी.सी.टी.एन.एस. प्रणालीवर अपलोड नसल्याने
8. **Acts & Sections (अधिनियम आणि कलम):**

| S.No.(अ. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|

**Report Printed on (अहवाल मुद्रित केलेली** 22/02/2019

**Report Printed by (द्वारे अहवाल मुद्रित केला):**

**Name** SHYAM GURUDAS KALE

**Rank (पद):** I (Inspector)

**Signature**

**Name** ~~SHYAM GURUDAS KALE~~

**Rank (पद):** I (Inspector) HC Rajesh Jaunjal

**No.(क्र.):** PCMH91209 932

स्टे.हा.अंमलदार
पो.ठाणे, गंगाझरी